# कामगार राज्य विमा महामंडळ
# श्रम व रोजगार मंत्रालय, भारत सरकार चे
# नागरिक / ग्राहक घोषणापत्र

| | |
|---|---|
| **पत्ता :-** | **का.रा.वि.महामंडळ, पंचदीप भवन** |
| | **सी.आई.जी. मार्ग, नई दिल्ली ११०००२** |
| **वेबसाइट :-** | **www.esic.nic.in** |
| **जारी करण्याची तारीख :-** | **एप्रिल, २०२२** |
| **पुढील पुनरावलोकन :-** | **एप्रिल, २०२३** |

# <u>पंचदीप लक्ष्य</u>

**आम्ही वचनबद्ध आहोत :**

देशातील संघटित क्षेत्रातील कामगारांना आरोग्य आणि सामाजिक सुरक्षा कवच प्रदान करण्यासाठी

# ध्येय

- विमाधारकांना दर्जेदार आरोग्य आणि सामाजिक सुरक्षा सेवांची तरतूद सुनिश्चित करणे
- कर्मचारी राज्य विमा योजनेचा विस्तार देशातील नवीन क्षेत्रात आणि रोजगार क्षेत्रांमध्ये करणे
- सर्व स्टेकहोल्डर्समध्ये क.रा.वि.योजनेबाबत जागरूकता निर्माण करणे

# <u>मुख्य सेवा / व्यवहार</u>

| क्र. सं. | सेवा/ व्यवहार* | महत्त्व : | जबाबदार व्यक्ती (पदनाम ) | ईमेल | दूरभाष | प्रक्रिया | आवश्यक कागदपत्रे | शुल्क | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | श्रेणी | साधन | रक्कम |
| १ | वैद्यकीय सुविधा | ४० | वैद्यकीय आयुक्त | mc-medadmin@esic.nic.in | ०११-२३२३१२०४ | ऑनलाइन | प्रत्यक्ष उपस्थिती | - | - | - |
| २ | नॉन-कव्हरेज, अनुपालन न करणे / कमी अहवाल देणे | २० | विमा आयुक्त (महसूल) | ic-revenue@esic.nic.in | ०११-२३२३७२९४ | युनिट्स/कर्मचाऱ्यांची ऑनलाइन नोंदणी, पालन न केल्याबद्दल/अंडर रिपोर्टिंगसाठी (कमी अहवाल) डिफॉल्टर कारवाई | अर्ज / तक्रारी/ चूककर्ता सूची | - | - | - |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | वैद्यकीय प्रतिपूर्ती | | १६ | वैद्यकीय आयुक्त | mc-medadmin@esic.nic.in | ०११-२३२३१२०४ | ऑनलाइन | दावा | - | - | - |
| ४ | रोख हितलाभ | | २४ | विमा आयुक्त (हितलाभ) | ic-revenue@esic.nic.in | ०११-२३२३७२९४ | | | - | - | - |
| | क्र सं. | हितलाभ | | | | | | | | | |
| | १ | आजारपण | २ | | | | ऑनलाइन | वैद्यकीय प्रमाणपत्र | - | - | - |
| | | | | | | | | आरएम-1 | | | |
| | | | | | | | | बँक खाते तपशीलांसह सर्व प्रकारे पूर्ण दावा | | | |
| | २ | विस्तारित आजारपण | ३ | विमा आयुक्त (हितलाभ) | ic-revenue@esic.nic.in | ०११-२३२३७२९४ | ऑनलाइन | वैद्यकीय प्रमाणपत्र | - | - | - |
| | | | | | | | | मेडिकल रेफरी / वैद्यकीय मंडळाचे मत | | | |
| | | | | | | | | बँक खाते तपशीलांसह सर्व प्रकारे पूर्ण दावा | | | |
| | ३ | वर्धित आजारपण | १ | विमा आयुक्त (हितलाभ) | ic-revenue@esic.nic.in | ०११-२३२३७२९४ | ऑनलाइन | वैद्यकीय प्रमाणपत्र | - | - | - |
| | | | | | | | | बँक खाते तपशीलांसह सर्व प्रकारे पूर्ण दावा | | | |
| | ४ | मातृत्व/ प्रसूती | ५ | विमा आयुक्त (हितलाभ) | ic-revenue@esic.nic.in | ०११-२३२३७२९४ | ऑनलाइन | वैद्यकीय प्रमाणपत्र | - | - | - |
| | | | | | | | | अनुपस्थिती पडताळणी अहवाल | | | |
| | | | | | | | | बँक खाते तपशीलांसह सर्व प्रकारे पूर्ण दावा | | | |
| ५ | अपंगत्व | | २ | विमा आयुक्त (हितलाभ) | ic-revenue@esic.nic.in | ०११-२३२३७२९४ | ऑनलाइन | अपघात अहवाल | - | - | - |
| | | | | | | | | सर्व आवश्यक कागदपत्रांसह तपास अहवाल उदा. FIR (लागू असल्यास) | | | |
| | | | | | | | | वैद्यकीय प्रमाणपत्र/ उपचार कागदपत्रे/ वैद्यकीय मंडळानी केलेले अपंगत्व मूल्यांकन | | | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | बँक खाते तपशीलांसह सर्व प्रकारे पूर्ण दावा | | | |
| ६ | आश्रितता | ३ | विमा आयुक्त (हितलाभ) | ic-revenue@esic.nic.in | ०११-२३२३७२९४ | ऑनलाइन | अपघात अहवाल<br>आवश्यक कागदपत्रांसह तपास अहवाल<br>आश्रितांच्या बँक खाते तपशीलांसह सर्व प्रकारे पूर्ण दावा | - | - | - |
| ७ | राजीव गांधी श्रमिक कल्याण योजना (बेरोजगारी भत्ता) | २ | विमा आयुक्त (हितलाभ) | ic-revenue@esic.nic.in | ०११-२३२३७२९४ | ऑनलाइन | बंदी/छाटणी/ गैर-रोज़गार इजा मुळे आलेला कायमस्वरूपी अपंगत्व जे ४०% पेक्षा कमी नाही, ह्यांचे प्रमाणपत्र<br>vkb- Mh-<br>कायद्यानुसार नियोक्ता प्रमाणपत्र/जीवन प्रमाणपत्र<br>बँक खाते तपशीलांसह सर्व प्रकारे पूर्ण दावा | - | - | - |
| ८ | अंत्यसंस्काराचा खर्च | २ | विमा आयुक्त (हितलाभ) | ic-revenue@esic.nic.in | ०११-२३२३७२९४ | ऑनलाइन | मृत्यु प्रमाणपत्र<br>कुटुंबातील सर्वात ज्येष्ठ हयात असलेल्या सदस्याने किंवा ज्या व्यक्तीने प्रत्यक्षात खर्च केला आहे अशा व्यक्तीकडून बँक खाते तपशीलांसह सर्व सर्व प्रकारे पूर्ण दावा | - | - | - |
| ९ | प्रसूती खर्च | २ | विमा आयुक्त (हितलाभ) | ic-revenue@esic.nic.in | ०११-२३२३७२९४ | ऑनलाइन | विमाकृत महिले द्वारे स्वतःचा / विमाकृत व्यक्ती द्वारे त्याच्या पत्नीच्या संदर्भात योग्य प्रपत्रा मध्ये बँक खाते | - | - | - |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | तपशीलांसह सर्व प्रकारे पूर्ण दावा | | | |
| १० | अटल बिमित व्यक्ती कल्याण योजना | १ | विमा आयुक्त (हितलाभ) | ic-revenue@esic.nic.in | ०११-२३२३७२९४ | ऑनलाइन | विमाकृत व्यक्ती/ विमाकृत महिले द्वारे निर्धारित प्रपत्र (एबी-१) मध्ये दावा.<br><br>बँक खाते तपशीलांसह नियोक्त्याकडून फॉर्म एबी-२ (कोरोना काळासाठी अटींमध्ये सूट) | - | - | - |
| ११ | "एसिक" कोविड-19 मदत योजना | १ | विमा आयुक्त (हितलाभ) | ic-revenue@esic.nic.in | ०११-२३२३७२९४ | ऑनलाइन | आश्रितांद्वारे बँक खाते तपशीलांसह विहित प्रपत्र (सीआरएस I आणि II) मध्ये दावा (अटी – विमाकृत व्यक्ती / विमाकृत महिलेचा मृत्यु कोविड-१९ मुळे झालेला असावा) | - | - | - |

## सेवा मानके

| क्र.सं. | सेवा / व्यवहार | महत्व | यश निर्देशक | सेवा मानक | एकक | डाटा स्रोत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय सुविधा | ४० | ३० दिवस | ३० दिवस | दिवस | 1. सीपीग्राम आणि www.esic.nic.in<br><br>२. आमच्या आधिकारिक वेबसाइट www.esic.nic.in वर सार्वजनिक तक्रारीची लिंक उपलब्ध आहे<br><br>३. टोल फ्री क्रमांक (२४ x ७) |
| २ | नॉन-कव्हरेज, अनुपालन न करणे / कमी अहवाल देणे | २० | ३१ दिवस | ३१ दिवस | दिवस | |
| ३ | वैद्यकीय प्रतिपूर्ती | १६ | ६० दिवस | ६० दिवस | दिवस | |
| ४ | रोख हितलाभ | २४ | दिवसांची संख्या | दिवस | दिवस | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | आजारपण | २ | ७ दिवस | ७ दिवस | दिवस | १८००११२५२६ (सामान्य उद्देश साठी)<br><br>४.ईमेल-<br>(i) pg-hqrs@esic.nic.in (सार्वजनिक तक्रारींसाठी),<br><br>(ii) itcare@esic.nic.in (आयटी संबंधित समस्यांवरील नियोक्त्यांच्या तक्रारींसाठी) |
| | २ | विस्तारित आजारपण | ३ | ७ दिवस | ७ दिवस | दिवस | |
| | ३ | वर्धित आजारपण | १ | ७ दिवस | ७ दिवस | दिवस | |
| | ४ | मातृत्व | ५ | १४ दिवस | १४ दिवस | दिवस | |
| | ५ | अपंगत्व | २ | ३० दिवस | ३० दिवस | दिवस | |
| | ६ | आश्रितजन | ३ | ९० दिवस | ९० दिवस | दिवस | |
| | ७ | बेरोजगारी भत्ता | २ | ३० दिवस | ३० दिवस | दिवस | |
| | ८ | अंत्यसंस्काराचा खर्च | २ | १ दिवस | १ दिवस | दिवस | |
| | ९ | प्रसूती खर्च | २ | १ दिवस | १ दिवस | दिवस | |
| | १० | अटल बिमित व्यक्ती कल्याण योजना | १ | १५ दिवस | १५ दिवस | दिवस | |
| | ११ | एसिक "कोविड-१९ मदत योजना" | १ | १५ दिवस | १५ दिवस | दिवस | |

## तक्रार निवारण यंत्रणा

या विभागात खालील बाबींशी संबंधित माहिती असावी :

| क्र.सं. | सार्वजनिक तक्रार अधिकाऱ्यांचे नाव | हेल्पलाइन क्रमांक | ई-मेल | मोबाईल क्र |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री एल. जमीर, विमा आयुक्त | ०११-२३२३५७७८ | l.jamir@esic.nic.in | ७०८६०५९३३३ |
| 2 | श्री काशी प्रसाद पाण्डेय, उप निर्देशक | ०११-२३२३५७८१ | kashi.pandey@esic.nic.in | ७८९५०००६९६ |
| 3 | श्री विकास सांगवान, सहाय्यक निर्देशक | ०११-२३२३१३५४ | vikas.sangwan@esic.nic.in | ९९९९७१९००४ |

**डेटा स्रोत:**

१. CPGRAMS आणि www.esic.nic.in

2. आपल्या अधिकृत वेबसाइट www.esic.nic.in वर सार्वजनिक तक्रारींची लिंक उपलब्ध आहे

३. टोल फ्री क्रमांक (२४ x ७): १८००११२५२६ (सामान्य उद्देशासाठी)

४. ईमेल-

(i) pg-hqrs@esic.nic.in (सार्वजनिक तक्रारींसाठी),

(ii) itcare@esic.nic.in (आयटी संबंधित समस्यांवरील नियोक्त्यांच्या तक्रारींसाठी)

**वेबलिंक: http://www.esic.in**

'सर्विस' पर्यायांतर्गत 'तक्रार निवारण (Grievance Redressal) निवडा.

**मुख्यालय कार्यालयातील सार्वजनिक तक्रार निवारण प्रणाली**

- सार्वजनिक तक्रार कक्षाचे प्रमुख वरिष्ठ अधिकारी असतात.
- क.रा.वि. महामंडळाच्या नियंत्रणाखालील सर्व कार्यालयांच्या तक्रारी निवारण यंत्रणेचे निरीक्षण करतात.
- तक्रारींचे त्वरित आणि प्रभावी निवारण सुनिश्चित करण्यासाठी सर्व क्षेत्रीय कार्यालये आणि रुग्णालयांमध्ये सार्वजनिक तक्रार अधिकारी नियुक्त केले गेले आहेत.
- तक्रारींच्या त्वरित निराकरणासाठी वेळोवेळी क.रा.वि.म. मुख्यालयाकडून मार्गदर्शक तत्त्वे जारी केली जातात.

**केंद्रीकृत सार्वजनिक तक्रार निवारण आणि देखरेख प्रणाली (सी.पी.जी,आर.ए.एम.एस.) (CPGRAMS)**

- क.रा.वि. महामंडळाशी सर्व संबंधित ऑनलाइन तक्रारी भारत सरकारच्या पीजी (PG) पोर्टलद्वारे प्राप्त होतात.
- पीजी सेल का.रा.वि.म. मुख्यालयाद्वारे तपशीलवार मानक कार्यप्रणाली (SOP) तयार केली गेली आहे आणि का.रा.वि.म. कार्यालयांद्वारे CPGRAMS, ईमेल इत्यादी विविध माध्यमांद्वारे प्राप्त झालेल्या सार्वजनिक तक्रारींचे निवारण करण्यासाठी ०८.12.२०२० रोजी जारी केली गेली आहे.
- तसेच श्रम व रोजगार मंत्रालय आणि पंतप्रधान कार्यालयाच्या सार्वजनिक तक्रार संचालनालयाद्वारे प्राप्त झालेल्या तक्रारींचेपण निरीक्षण करणे.

**सुविधा समागम**

- लाभार्थ्यांच्या सार्वजनिक तक्रारींचे त्वरित निवारण.
- क.रा.वि. महामंडळाच्या क्षे.का./उ.क्षे.का. मध्ये दर महिन्याच्या दुसऱ्या बुधवारी (दुपारी) आणि डीसीबीओ/ शा.का. मध्ये दर महिन्याच्या दुसऱ्या शुक्रवारी बैठकांचे आयोजन केले जाते .
- त्याच परिसर/नगर/शहरातील क.रा.वि.म./ क.रा.वि.यो. रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षकाने क्षे.का./उ.क्षे.का. मधील सुविधा समागमाला उपस्थित राहणे आवश्यक आहे.
- क्षे.का./उ.क्षे.का. पासून लांब असलेल्या शहर/नगरात नियुक्त केलेले वैद्यकीय अधीक्षक यांना हॉस्पिटल स्तरावर सुविधा समागम आयोजित करण्याचे निर्देश दिले आहेत.

**सुविधा केंद्र**

योजनेच्या लाभार्थ्यांशी अधिक चांगला संवाद साधण्यासाठी महामंडळाने सर्व प्रादेशिक कार्यालये, उपप्रादेशिक कार्यालये, क.रा.वि.म. हॉस्पिटल आणि मॉडेल हॉस्पिटलमध्ये सुविधा केंद्रे उघडली आहेत.

## सेवा प्राप्तकर्त्यांकडून सूचक अपेक्षा

## काही विविध तरतुदी

**विशिष्ट प्रकरणांमध्ये लाभांसाठी अपात्रता:**

एखादी व्यक्ती ज्या दिवशी कामावर असते आणि मजुरी मिळविते, त्या दिवसासाठी ती आजारपण लाभ (एसबी) किंवा मातृत्व लाभ (एमबी) किंवा तात्पुरत्या अपंगत्व लाभासाठी पात्र नसेल.

आजारपणाचा लाभ किंवा तात्पुरता अपंगत्व लाभ प्राप्त करणाऱ्याने वैद्यकीय उपचाराखाली राहणे आवश्यक आहे आणि त्याचे विमा वैद्यकीय अधिकारी यांनी दिलेल्या सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे. त्याने आपल्या वैद्यकीय अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय उपचाराचे क्षेत्र सोडू नये आणि स्वतःच्या तपासणीसाठी वैद्यकीय अधिकारी किंवा महामंडळाने अधिकृत केलेल्या इतर कोणत्याही व्यक्ती समोर उपस्थित रहावे.

**लाभाच्या अधिकाराचे रक्षण करणे:**

कर्मचाऱ्यांच्या राज्य विमा कायद्यांतर्गत देय रोख लाभ कोणत्याही न्यायालयीन डिक्री किंवा आदेशाच्या अंमलबजावणीसाठी संलग्न किंवा विक्रीसाठी जबाबदार नाहीत. तसेच, कोणताही लाभ प्राप्त करण्याचा अधिकार हस्तांतरणीय किंवा इतरांना नेमन्याजोगा नाही.

**बडतर्फी, डिस्चार्ज किंवा इतर शिक्षेपासून संरक्षण:**

एखाद्या कर्मचाऱ्याला खालील कालावधीत बडतर्फ, डिस्चार्ज किंवा इतर शिक्षेपासून संरक्षण दिले जाते:

(१) अपंगत्व लाभ प्राप्तकर्त्याच्या बाबतीत ६ महिन्यांचा कालावधी;

(२) एखादा कर्मचारी गर्भधारणेमुळे किंवा बंदिवासामुळे आजारी किंवा प्रमाणित आजारासाठी वैद्यकीय उपचार घेत असल्यास ६ महिन्यांचा कालावधी;

(३) एखादा कर्मचारी क्षयरोग, कुष्ठरोग, मानसिक, घातक किंवा ३४ निर्दिष्ट आजारांपैकी कोणत्याही आजारासाठी वैद्यकीय उपचार घेत असल्यास १२ महिन्यांचा कालावधी.

**न्यायनिर्णय यंत्रणा :**

दावेदारांचा हक्क प्रभावी करण्यासाठी, प्रत्येक दावेदाराला कर्मचारी विमा न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार आहे. राज्य सरकारने नियुक्त केलेल्या न्यायिक अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली ते काम करतात. अशा सर्व प्रकरणांमध्ये दिवाणी न्यायालयाचे कार्यक्षेत्र प्रतिबंधित आहे.

**हितलाभ देयकांची परतफेड आणि पुनर्प्राप्ती :**

जर एखाद्या व्यक्तीला कोणताही हितलाभ मिळाला ज्याचा तो कायदेशीररित्या हक्कदार नव्हता, तर तो अशा कोणत्याही फायद्याचे मूल्य महामंडळाला परत करण्यास जबाबदार राहिल.

**खोट्या विधानासाठी शिक्षा, वगैरे:**

चुकीच्या पध्दतीने लाभ मिळवण्याच्या उद्देशाने केलेले कोणतेही खोटे विधान किंवा खोटे प्रतिनिधित्व, इ. कर्मचारी राज्य विमा कायद्यान्वये गुन्हा ठरतो, ज्यासाठी तीन महिन्यांपर्यंत कारावास किंवा पाचशे रुपये दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

**अधिक चांगल्या आणि जलद सेवांसाठी**

**कृपया लक्षात ठेवा :**

पहचान कार्ड/ई पहचान कार्ड हा तुमचा सामाजिक सुरक्षिततेचा व्हिसा आहे; याचे हरविणे किंवा नुकसान होण्यापासून संरक्षण करा.

- पहचान कार्ड/ई-पहचान कार्ड हरवल्यास, तुमच्या शाखा कार्यालय/दवाखान्याला या प्रकरणाची तक्रार करा.
- आयपीचा विमा क्रमांक आता देशभरात पोर्टेबल आहे.
- जर तुम्ही नोकरीत रुजू/बदल करत असाल आणि ईएसआय नोंदणी क्रमांकावर (विमा क्रमांक) आधीच नोंदणीकृत असाल, तर कृपया ते तुमच्या नवीन नियोक्त्याला कळवा.
- काही हितलाभ तुमच्या योगदानाच्या कालावधिवर आधारित असतात. म्हणून, रोजगार बदलल्यावर, विद्यमान क.रा.वि.म. विमा क्रमांकावर स्वतःची नोंदणी केल्याने, तुम्हाला अशा वाढीव/योगदानाशी संबंधित लाभ मिळतील.
- ईएसआय दवाखाना/रुग्णालयाला भेट देताना नेहमी तुमचे पेहचान कार्ड/ई-पहचान कार्ड, हेल्थ पास बुक आणि/किंवा संगणकाने तयार केलेली ओपीडी स्लिप सोबत ठेवा. तुम्हाला या सुविधा जलद मिळतील. तुमचा पूर्वीचा वैद्यकीय इतिहास सहज पाहता येतो.
- तुमची टीडीबी संपुष्टात आल्यानंतर लगेच वैद्यकीय मंडळाकडे तपासणीसाठी अर्ज करा.
- आणीबाणी वगळता उपचारासाठी रेफरल प्रक्रियेचे अनुसरण करा.
- तुमची तक्रार असल्यास, त्वरीत निवारणासाठी तुम्ही संलग्न असलेल्या शाखा कार्यालय व्यवस्थापक/दवाखाना प्रभारींशी संपर्क साधा. या शिवाय,प्रत्येक महिन्याच्या एका निश्चित दिवशी सुविधा समागम ही संकल्पना देखील कराविम च्या सर्व कार्यालयांमध्ये सुरू करण्यात आली आहे.
- करावि कर्मचाऱ्यांशी विनम्र वागा आणि त्यांच्याकडून नेहमी सौजन्य आणि सहकार्याची अपेक्षा करा.

**तुम्हाला मदत करण्यासाठी आम्हाला मदत केल्याबद्दल**

**कृपया:**

- वैद्यकीय सुविधेच्या उद्देशाने तुमच्या कुटुंबाच्या तपशिलांमध्ये पात्र नसलेल्या कोणत्याही व्यक्तीला जोडू नका.
- तुमच्या पहचान कार्ड/ई-पहचान कार्ड आणि हेल्थ पास बुकमध्ये छेडछाड किंवा ते खराब करू नका.
- कोणत्याही लाभाचा दावा करण्यासाठी खोटे आजार किंवा दुखापत करू नका.
- तुमचे पेहचान कार्ड/ई-पहचान कार्ड इतर कोणालाही उधार देऊ नका.
- चुकीचे प्रमाणपत्र, इत्यादीसाठी तुमच्या डॉक्टरांना सक्ती करू नका.
- ईएसआयसीच्या कोणत्याही कृपेसाठी दलालांकडे जाऊ नका.
- कोणत्याही ईएसआयसी फॉर्मसाठी पैसे देऊ नका. हे शाखा कार्यालयातून विनामूल्य पुरवले जातात.
- जन्म/मृत्यू झाल्यास तुमच्या घोषणेमध्ये कुटुंबातील सदस्य जोडणे/हटवणे विसरू नका.
- बाहेरच्या प्रवासात तुमच्या नियोक्त्याने सही केलेला फॉर्म १०५ सोबत ठेवण्यास विसरू नका. हे तुम्हाला कुठेही ईएसआयसीच्या सुविधेचा लाभ घेण्यास सक्षम करेल.

**कराविम हा तुमचा विश्वस्त आहे - यावर नेहमी विश्वास ठेवा**

**लक्षात ठेवण्यासारखे काही मुद्दे**

- तुमच्या डॉक्टरांच्या सूचनांचे काळजीपूर्वक पालन करा.
- तुमच्या डॉक्टरांनी सांगितल्यानुसार वैद्यकीय उपचार सुरू ठेवा.
- नियुक्त वेळ आणि तारखेला वैद्यकीय रेफरीसमोर हजर राहण्यास चुकू नका.
- तुम्ही तुमच्या कामावर उपस्थित राहू शकत नसाल तरच वैद्यकीय प्रमाणपत्र मिळवा.

- तुमच्या फॉर्मवर तपशील आणि तारखा अचूक भरा आणि ईएसआयसी मिळवण्याच्या तुमच्या दाव्यावर कोणतीही चुकीची घोषणा करू नका.
- तुम्हाला काही शंका असल्यास किंवा स्पष्टीकरण हवे असल्यास, तुमच्या शाखा कार्यालय व्यवस्थापकाशी किंवा दवाखान्याच्या प्रभारींशी संपर्क साधा.

**<u>नोकरदारांना फायदे</u>**

करावि कायदा, १९४८ च्या कक्षेत येणारे नियोक्ते या योजनेअंतर्गत खालील फायदे मिळवितात: -

- नियोक्ते त्यांच्या कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या अवलंबितांना वैद्यकीय सुविधा किंवा निश्चित रोख भत्ते, प्रतिपूर्ती किंवा वास्तविक खर्च, एकरकमी सहाय्य किंवा मर्यादित सुविधांसह इतर कोणतीही वैद्यकीय विमा पॉलिसी निवडणे यासारख्या सुविधा प्रदान करण्याच्या त्यांच्या दायित्वापासून मुक्त होतात, जोपर्यंत ते नियोक्त्याचे करारबद्ध बंधन नाही.
- नियोक्त्यांना लागू होण्यापासून सूट देण्यात आली आहे:
  - मातृत्व लाभ कायदा
  - करावि योजनेंतर्गत समाविष्ट कर्मचाऱ्यांच्या संबंधात कर्मचारी भरपाई कायदा,
- अशाप्रकारे नियोक्त्यांना त्यांची उत्पादकता वाढवण्यासाठी एक आवश्यक घटक म्हणून उत्पादक आणि पूर्णपणे सुरक्षित कर्मचारीवर्ग प्राप्त असतो.
- आजारपणामुळे वेतन कमी होणे, सेवेदरम्यान दुखापत होणे किंवा कर्मचाऱ्यांना शारीरिक अपंगत्व येणे यासारख्या शारीरिक तणावाच्या क्षणी, नियोक्ते विमाधारक कर्मचाऱ्यांच्या संदर्भात देय रोख रक्कम देण्याच्या जबाबदारीपासून मुक्त होतात कारण विमा उतरवलेल्या कर्मचाऱ्यांच्या संदर्भात रोख रक्कम भरण्याची जबाबदारी महामंडळाकडे हस्तांतरित केली जाते.
- करावि कायद्यांतर्गत योगदानाद्वारे भरलेली कोणतीही रक्कम आयकर कायद्यांतर्गत 'उत्पन्न' गणनेमध्ये वजा केली जाते.

**दिव्यांग व्यक्तींना रोजगार देणाऱ्या खाजगी क्षेत्रातील नियोक्त्यांना प्रोत्साहन**

दिव्यांग व्यक्तींना खाजगी क्षेत्रात रोजगार उपलब्ध करून देणार्या नियोक्त्यासाठी प्रोत्साहन योजना, श्रम व रोजगार मंत्रालय राजपत्र अधिसूचना क्रमांक S-38025/2/2008-SS.I दिनांक ३१.०३.२००८ मध्ये प्रकाशित भारताचे राजपत्र असाधारण भाग II, कलम ३ उपविभाग (१) द्वारे दिनांक ०१.०४.२००८ पासून लागू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत ०१.०४.२००८ रोजी किंवा त्यानंतर नोकरीवर असलेल्या आणि २५,०००/- रुपयांपर्यंतचे मासिक वेतन मिळविणाऱ्या दिव्यांग व्यक्तींना समाविष्ट केले जाते आणि नियोक्त्याने भरावे लागणारे योगदान 03 वर्षांच्या कालावधीसाठी सरकारद्वारे भरले जाते.

# नियोक्त्यांची भूमिका

- करावि कायदा लागू झाल्यानंतर नियोक्त्याने त्यांचा कारखाना/आस्थापना त्वरित नोंदणीकृत करून घ्यावी.

  याद्वारे नियोक्ते त्यांच्या युनिट्सची नोंदणी करू शकतात:
  - करावम वेब पोर्टल – www.esic.in
  - श्रम सुविधा पोर्टल
  - नवीन नोंदणीकृत कंपन्या, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाच्या पोर्टलद्वारे.
  - सर्व करावम फॉर्म, दस्तऐवज आणि करावम च्या विविध कार्यालयांशी पत्रव्यवहारामध्ये नियोक्ता क्रमांक वापरा.
  - नियोक्त्यांना सूचित केले जाते की त्याच्या/तिच्या कर्मचाऱ्याला नोकरीत घेण्यापूर्वी त्याच्या/तिच्या कर्मचाऱ्याचे अचूक तपशील डिक्लेरेशन फॉर्ममध्ये मिळवावेत (जोपर्यंत हा कर्मचाऱ्याची पूर्वी करावम मध्ये नोंदणी झालेली नसेल) आणि त्यावर कर्मचाऱ्यांची स्वाक्षरी घ्यावी. त्यानंतर त्यांनी ही माहिती ऑनलाइन डिक्लेरेशन फॉर्ममध्ये भरावी आणि त्याच्या/तिच्या कर्मचाऱ्यांची ESIC कायद्यांतर्गत त्वरित नोंदणी करावी.
  - कामगार/मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या एजन्सीच्या बाबतीत, सहा महिन्यांसाठी आगाऊ योगदानाचे चलन नियोक्त्यांनी ESIC वेब पोर्टलद्वारे तयार केले पाहिजे जे बँकेत जमा केले पाहिजे.
  - ईएसआय योगदान (नियोक्त्याचा हिस्सा @ ३.२५% (०१.०७.२०१९ पासून) आणि कर्मचाऱ्यांचा हिस्सा @ ०.७५% (०१.०७.२०१९ पासून) वेतन देय असेल्याच्या पुढील महिन्याच्या १५ दिवसांच्या भरावे.
  - कर्मचारी विमा क्रमांक, एकदा मिळाल्यानंतर, तो कर्मचाऱ्याच्या आयुष्यभरासाठी वैध असतो. त्याने स्थान किंवा रोजगार बदलल्यास त्याला पुन्हा नोंदणी करण्याची आवश्यकता नाही.

## तेव्हा काय करावे (नियोक्त्यांद्वारे)

विमाधारक कर्मचाऱ्यांना ESI लाभांचा सुरळीत प्रवाह सुनिश्चित करण्यासाठी

- कर्मचाऱ्यांची ऑनलाइन नोंदणी सर्व संबंधित माहितीसह, नियुक्तीच्या वेळी योग्यरित्या आणि त्वरित केली जाऊ शकते.
- तात्पुरते ओळख प्रमाणपत्र (ई-पहचान कार्ड) ची प्रिंट आऊट कर्मचाऱ्यांना त्वरीत दिली जाऊ शकते जेणेकरून ते रोजगाराच्या पहिल्या दिवसापासून करावि लाभ घेऊ शकतील.
- ओळख प्रमाणपत्र/ओळखपत्र नसताना नवीन विमाधारक व्यक्तीला योजनेंतर्गत वैद्यकीय लाभ मिळावा यासाठी, विमाधारक व्यक्तीला फॉर्म 86 मध्ये रोजगाराचे प्रमाणपत्र जारी केले जाऊ शकते, नियोक्त्याने जारी केलेले हे प्रमाणपत्र 3 महिन्यांसाठी वैध राहते परंतु 3 महिन्यांपेक्षा जास्त नसलेल्या पुढील कालावधीसाठी पुनर्प्रमाणित केले जाऊ शकते.
- जेव्हा जेव्हा विमाधारक व्यक्तीच्या कौटुंबिक तपशीलातिल विवाह, जन्म किंवा मृत्यू यासारख्या घटनांमध्ये कोणतीही भर घालणे किंवा हटवणे आवश्यक असते तेव्हा आवश्यक माहिती ESIC वेब पोर्टलवर अपलोड केली जाऊ शकते.
- एखाद्या व्यक्तीने विमापात्र रोजगारात पुन्हा प्रवेश केल्यावर किंवा, जेथे विमाधारक व्यक्तीच्या योगदान परताव्याची निर्मिती न केल्यामुळे वैद्यकीय लाभांसाठी पात्रता संपुष्टात आली असेल, तेथे अशा व्यक्तीला नियोक्ता 'पुनर्रोजगाराचे प्रमाणपत्र' किंवा 'निरंतर रोजगार' प्रमाणपत्र फॉर्म एसिक-37 मध्ये जारी करू शकतो. हे प्रमाणपत्र विमाधारक व्यक्तीला जारी केल्याच्या तारखेपासून वैद्यकीय लाभ घेण्यास पात्र करेल.
- विमाधारक कर्मचाऱ्याला कोणत्याही वैध कारणांमुळे दवाखाना बदलण्याची गरज असल्यास, नियोक्ता कराविम वेब पोर्टलमधील ड्रॉप डाउन सूचीमधून दवाखाना बदलू शकतो.
- जेव्हा एखादी विमाधारक व्यक्ती ड्युटीवर किंवा रजेवर स्टेशनबाहेर जाते, तेव्हा त्याला फॉर्म एसिक १०५ मध्ये प्रमाणपत्र दिले जाऊ शकते. यामुळे त्याला आणि त्याच्या कुटुंबाला इतरत्र ईएसआय दवाखाने/रुग्णालयांमध्ये वैद्यकीय उपचार मिळू शकतील, जर बाहेरच्या ठिकाणी उपलब्ध असतील तर .

- नियोक्ते वैयक्तिक कर्मचाऱ्यांना ESI योजनेंतर्गत कोणत्याही कायदेशीर फायद्याचा दावा करण्यासाठी सहाय्य करू शकतात किंवा त्यांना मार्गदर्शन करू शकतात आणि त्यांना योजनेअंतर्गत त्यांच्या अधिकार आणि जबाबदाऱ्यांबद्दल योग्यरित्या शिक्षित देखील करू शकतात.

- मजुरी किंवा कमाईची क्षमता कमी होण्याच्या अनुचित घटनेच्या पार्श्वभूमीवर ईएसआय योजनेची उपयुक्तता स्पष्ट केली जाऊ शकते.

- ईएसआय कायद्यांतर्गत तुमचे अधिकार आणि जबाबदाऱ्यांबाबत कोणत्याही संशयाच्या स्पष्टीकरणासाठी, स्वयंघोषित सल्लागार किंवा इतर कोणत्याही अनधिकृत व्यक्तींच्या सल्ल्यावर अवलंबून न राहता ESIC अधिकाऱ्याच्या संपर्कात राहण्याचा सल्ला दिला जातो.

## नियोक्त्यांचे अधिकार

- क.रा.वि. महामंडळ, वैद्यकीय हितलाभ परिषद आणि महामंडळाच्या इतर महत्वाच्या समित्यांवर प्रतिनिधित्व करणे ज्या वेळोवेळी स्थापित केल्या जाऊ शकतात.

- ईएसआय कायद्यांतर्गत कोणतेही दायित्व पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेले सर्व फॉर्म प्रदान करणे.
- विमाधारक व्यक्तीच्या वेतनातूनच कर्मचाऱ्यांच्या योगदानाचा वाटा वसूल करणे. दाव्याबद्दल विवाद झाल्यास क.रा.वि. महामंडळाच्या अपील-अधिकार्याकडे अपील करणे.
- अपील-अधिकार्याकाच्या निष्कर्षांवर समाधानी नसल्यास कर्मचारी विमा न्यायालयात अपील करणे.
- व्यवस्थापनेद्वारे प्रदान केलेले फायदे ईएसआय योजनेअंतर्गत उपलब्ध असलेल्या लाभांपेक्षा समान किंवा श्रेष्ठ असल्यास योजनेच्या लागू होण्यापासून सूट मिळविण्याचा अधिकार.
- कायद्याची लागूता, फायदे, योगदान, तपासणी आणि इतर प्रक्रियांशी संबंधित सर्व आवश्यक माहिती मिळवण्याचा अधिकार.

## नियोक्त्यांना सेवा देण्यासाठी ESIC ची भूमिका

- नियोक्त्यांसह प्रतिसादात्मक, हेतूपूर्ण आणि उत्पादक संबंध विकसित करण्यासाठी.

- ESI योजनेच्या सुधारणेत त्यांचा सक्रिय सहभाग घेण्यासाठी.
- ESI कायद्यांतर्गत त्यांची कायदेशीर जबाबदारी पूर्ण करण्यासाठी त्यांना आवश्यक मार्गदर्शन प्रदान करा.
- त्यांना वेळोवेळी आवश्यक असलेले फॉर्म आणि परफॉर्मा उपलब्ध करून द्या.
- हि खात्री करने की IMOs/पॅनेल डॉक्टरांद्वारे कोणतेही शिथिल वैद्यकीय प्रमाणपत्र कारखाने किंवा आस्थापनेंची उत्पादकता कमी करणार नाही.
- हि खात्री करने की कोणतीही अडचण, शंका किंवा गैरसमज असल्यास, नियोक्त्याला योग्य स्तरावर सुनावणी घेण्याची संधी दिली जात आहे ना.
- हि खात्री करने की नियोक्त्याकडून येणाऱ्या सर्व पत्रव्यवहारांना वेळेवर आणि वस्तुनिष्ठपणे प्रतिसाद दिला जात आहे ना.
- हि खात्री करने की नियोक्त्याच्या परिसराची किंवा रेकॉर्ड्सची तपासणी करण्यासाठी असलेल्या महामंडळाच्या कोणत्याही अधिकृत अधिकाऱ्याकडून नियोक्त्याला त्रास तर दिला जात नाही ना.
- हि खात्री करने की नियोक्त्यांकडून प्राप्त झालेल्या सर्व तक्रारींच्या त्वरित निराकरणासाठी तत्परतेने दखल घेतली जात आहे ना.

## **भागधारक (स्टेकहोल्डर्स) / ग्राहकांची यादी**

| **अनु क्र.** | **भागधारक (स्टेकहोल्डर्स) / ग्राहक** |
|---|---|
| १. | केंद्रीय मंत्रालये/विभाग |
| २ . | राज्य सरकार / केंद्रशासित प्रदेश प्रशासन |
| ३. | क.रा.वि. कायद्यांतर्गत कार्यान्वित क्षेत्रात कार्यरतिल सर्व युनिट्स जिथे 10 किंवा च्यापेक्ष्या अधिक कर्मचारी आहेत. |
| ४. | कार्यान्वित क्षेत्रांमध्ये काम करणारे सर्व कामगार जे प्रति महिना रु. 21,000/- पर्यंत वेतन मिळवितात. |
| ५. | विमाप्राप्त व्यक्तीच्या कुटुंबातील सर्व सदस्य/आश्रितजण. |
| ६. | सर्व साहित्य पुरवठादार आणि सेवा प्रदाते. |
| ७. | सर्व ट्रेड युनियन संघटना |

| | |
|---|---|
| ८. | सर्व नियोक्ता संघटना |

## जबाबदारी केंद्र आणि अधीनस्थ संस्था

| **अनु क्र.** | **जबाबदारी केंद्र आणि अधीनस्थ संस्था** | **लँडलाइन क्रमांक** | **ई-मेल** | **पत्ता** |
|---|---|---|---|---|
| १. | सर्व ESIC प्रादेशिक संचालक | अधिकृत वेबसाइट म्हणजे www.esic.nic.in वर माहिती उपलब्ध आहे. | | |
| २ . | सर्व संचालक, ESIC उपप्रादेशिक कार्यालये | अधिकृत वेबसाइट म्हणजे www.esic.nic.in वर माहिती उपलब्ध आहे. | | |
| ३. | सर्व वैद्यकीय अधीक्षक, ESIC रुग्णालय | अधिकृत वेबसाइट म्हणजे www.esic.nic.in वर माहिती उपलब्ध आहे. | | |
| ४. | सर्व वैद्यकीय अधीक्षक, ESIS रुग्णालय | अधिकृत वेबसाइट म्हणजे www.esic.nic.in वर माहिती उपलब्ध आहे. | | |
| ५. | सर्व ESIC वैद्यकीय/पीजी शैक्षणिक संस्था | अधिकृत वेबसाइट म्हणजे www.esic.nic.in वर माहिती उपलब्ध आहे. | | |
| ६. | सर्व औषधालय-सह-शाखा कार्यालय/शाखा कार्यालय, ESIC | अधिकृत वेबसाइट म्हणजे www.esic.nic.in वर माहिती उपलब्ध आहे. | | |
| ७. | सर्व ESIC औषधालय | अधिकृत वेबसाइट म्हणजे www.esic.nic.in वर माहिती उपलब्ध आहे. | | |
| ८. | सर्व ESIS औषधालय | अधिकृत वेबसाइट म्हणजे www.esic.nic.in वर माहिती उपलब्ध आहे. | | |